Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - II FEBRUARY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# नागपूर शहरातील लोकसंख्येचा अभ्यास

**डॉ. अंकुश ना. बारमाटे**
सहाय्यक प्राध्यापक
भूगोल विभाग प्रमुख
श्री चक्रपाणी कला महाविद्यालय
हुडकेश्वर रोड, नागपूर

**सारांश**

*मानवी भूगोल विषयाचा अभ्यास करतांना लोकसंख्येचा अभ्यास हा लोकसंख्या भूगोल या विषयात करण्यात येतो. एखाद्‌या राष्ट्राचा भौगोलीक अभ्यास करतांना तेथील लोकसंख्या हा अत्यंत महत्वपूर्ण घटक असतो. एखाद्या राष्ट्राची प्रगती ही तेथील लोकसंख्येवर अवलंबून असते. लोकसंख्येवर भौगोलीक घटकांचा प्रभाव पडतो. आज जगात सर्वत्र लोकसंख्या वेगाने वाढत आहे. भारत देश हा लोकसंख्येच्या बाबतीत जगात दूसऱ्या क्रमांकावर आहे. भारत देशात लोकसंख्येची वाढ जलदगतीने होत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ करोड पेक्षा जास्त आहे. नागपूर जिल्हा हा महाराष्ट्रात लोकसंख्येच्या बाबतीत वेगाने वाढत आहे. नागपूर शहरात लोकसंख्येचा मोठा बदल झाला आहे. नागपूर शहरातील वाढणारी लोकसंख्या व नागपूर शहराचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. नागपूर शहरातील लोकसंख्येची होणारी वाढ व लोकसंख्येत होणारे बदल यातून नागपूर शहराची लोकसंख्येचा वाढ व नागपूर शहराचा विस्तार लोकसंख्येच्या अभ्यासाने दिसतो.*

***बिजसंज्ञा :–*** *लोकसंख्या, लोकसंख्या घनता, जनगणना*

## प्रस्तावना

नागपूर शहर भौगोलीकदृष्ट्या वैशिष्टयपूर्ण शहर आहे. या शहरात लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाढणाऱ्या लोकसंख्येमूळे नागपूर शहराचा विस्तार वाढत आहे. २००१ च्या जनगणनेपेक्षा २०११ च्या जनगणनेत नागपूर शहराची लोकसंख्या खुप वाढली आहे. नागपूर शहरात रोजगार मिळविण्याकरिता अनेक लोक नागपूर शहरात येवून वास्तव्य करीत आहे. त्यामूळे नागपूर शहराचा विस्तार वाढत आहे. लोकसंख्येच्या वाढीने नागपूर शहरात अनेक बदल झाले आहेत. नागपूर शहराची वाढणारी लोकसंख्या वाढ लोकसंख्येच्या अभ्यासाने नागपूर शहरातील वाढणारी लोकसंख्या व वाढणाऱ्या विस्ताराची माहीती होणार आहे. त्यामूळे या शोध पत्रिकेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## अभ्यासक्षेत्र




**नागपूर शहर नकाशा**

**स्त्रोत** www.google.com/nagpurcitymap

नागपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यात विदर्भ क्षेत्रात आहे. नागपूर शहर हे भारतातील मध्यवर्ती शहर आहे. नागपूर जिल्हयाचे क्षेत्रफळ ८२५३ चौ. की.मी. आहे. नागपूर जिल्हयाचे स्थान २१°४५' उत्तर अक्षांश ते २०°३०' उत्तर अक्षांश आहे व ७८°१५' पूर्व ते ७९°४५' पूर्व रेखांश या दरम्यान

**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
Vol - VI | Issue - II | FEBRUARY | 2019 | Peer Review e-Journal | Impact Factor 5.707 | ISSN 2349-638x

आहे. नागपूर शहराचे स्थान २१°९' उत्तर अक्षवृत्त ते ७९°५' पूर्व रेखांश दरम्यान आहे. या शहराचे भौगोलीक क्षेत्रफल २२७.३६ चौ. की.मी. आहे. नागपूर शहराची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनूसार २४,९७,८७० आहे. भारतात नागपूर शहराचा लोकसंख्येच्या बाबतीत १३ वा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात लोकसंख्येत ३ रा क्रमांक लागतो व विदर्भात प्रथम क्रमांकाचे शहर लोकसंख्येच्या बाबतीत आहे.

**माहीतीचे संकलन व संशोधन पध्दती**

''नागपूर शहरातील लोकसंख्येच्या अभ्यास'' या शोधपत्रिकेचा अभ्यास करतांना माहीतीचे संकलन डीस्ट्रीक्ट गॅझेटीअर बूक, सरकारी कार्यालये, नागपूर महानगरपालीका व संकेतस्थळावरून गोळा केलेली आहे. शोधपत्रीकेतील माहीती ही व्दितीय स्त्रोतावर आधारीत आहे.

प्रस्तूत शोधपत्रिकेचा अभ्यास करतांना निरीक्षण पध्दतीचा व सांखिकीय पध्दतीचा उपयोग करून मिळविलेल्या माहीतीच्या आधारे सारण्या व आलेखाव्दारे विश्लेषण केले आहे.

**शोधपत्रिकेचा उद्देश**

या शोधपत्रिकेचा अभ्यास करण्याचा मुख्य उद्देश नागपूर शहराची लोकसंख्येची रचना अभ्यासणे आहे. तसेच लोकसंख्येतील होणारी वाढ व नागपूर शहराचा विस्तार अभ्यासणे हे आहे.

**महितीचे विश्लेषण**

नगपूर शहर हे महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्याच्या बाबतीत तिसरा क्रमांक असणारे शहर आहे. नागपूर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. भारत देशात केंद्रवर्ती स्थान असलेले शहर नागपूर आहे. त्यामूळे नागपूर शहराचे महत्व अनन्यसाधारण आहे. वाढणाऱ्या लोकसंख्येमूळे शहराचा विस्तार मोठा होत आहे.

**सारणी क्रमांक (१)**

**नागपूर शहर लोकसंख्या (१९८१ ते २०११)**

| अ. क्र. | जनगणना वर्ष | लोकसंख्या | लोकसंख्या वाढ (टक्केमध्ये) |
|---|---|---|---|
| १. | १९८१ | १२,१९,५०० | – |
| २. | १९९१ | १६,६४,००० | ३६.४ टक्के |
| ३. | २००१ | २१,२९,५०० | २८.० टक्के |
| ४. | २०११ | २४,०५,६६५ | १३.० टक्के |

स्त्रोत %& www.censusindia.com




वरिल सारणी क्र. १ चा अभ्यास केला असता असे दिसून येते की, नागपूर शहराची लोकसंख्या इ.स. १९८१ यावर्षी १२,१९,५०० होती. इ.स. १९९१ मध्ये शहराची लोकसंख्या १६,६४,००० एवढी वाढली. १९८१–१९९१ या दहा वर्षाच्या कालावधीत लोकसंख्येत ३६.०४ टक्के वाढ आढळली. इ.स. २००१ या वर्षी नागपूर शहराची लोकसंख्या २१,२९,५०० झाली. इ.स. १९९१ या वर्षातील वाढीपेक्षा इ.स. २००१ या वर्षी लोकसंख्येतील वाढीत २८ टक्के बदल झाला. इ.स. १९९१ या वर्षापेक्षा २००१ या वर्षी लोकसंख्यावाढीचा दर कमी झाला होता. इ.स. २०११ या वर्षी नागपूर शहराच्या लोकसंख्येत जनगणनेनुसार २४,०५,६६५ आढळते. इ.स. २००१ या वर्षापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर १३ टक्के होता. लोकसंख्यावाढीचा दर हा १९८१ ते २०११ या वर्षातील जनगणनेपेक्षा इ.स. २०११ या वर्षी लोकसंख्या वाढीचा दर मागील ३० दशकात कमी झाला होता.

**सारणी क्रमांक २**

**नागपूर शहर स्त्री व पूरूष लोकसंख्या (२०११)**

| एकूण लोकसंख्या | पुरूष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या |
|---|---|---|
| २४,०५,६६५ | १२,२५,४०५ | ११,८०,२६० |
| एकूण बालके (०–६) | बालक | बालिका |
| २,४७,०७८ | १,२८,२९० | १,१८,७८८ |

स्त्रोत :– www.censusindia.com

**नागपूर शहर लोकसंख्या**




सारणी क्र. २ च्या अभ्यासाने असे दिसून येते की, नागपूर शहराची लोकसंख्या इ.स. २०११ या वर्षी २४,०५,६६५ आहे. या लोकसंख्येत पुरूषांची लोकसंख्या १२,२५,४०५ आहे. तर स्त्रीयांची लोकसंख्या ११,८०,२६० आहे. २००१ च्या वर्षाच्या जनगणनेपेक्षा पुरूष व स्त्रीयांच्या लोकसंख्येत वाढ झाली आहे. इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार ० ते ६ वयोगटातील बालकांची एकूण संख्या १,२८,२९० आहे तर बालीकांची संख्या १,१८,७८८ आहे. इ.स. २०११ या वर्षीच्या जनगणनेनुसार ० ते ६ वयोगटातील लोकसंख्या १० टक्के च्या वर आहे. एकूण लोकसंख्येत २,४७,०७८ नागपूर शहराची लोकसंख्या ० ते ६ वयोगटातील आहे.

२०११ या वर्षाच्या जनगणनेनुसार नागपूर शहरातील लोकसंख्येची घनता दर चौ.की.मी. ला ११,००० लोक आहे. महाराष्ट्रातील लोकसंख्या घनतेच्या बाबतीत नागपूर शहराचा क्रमांक पाचवा लागतो. नागपूर शहरात दर हजार पुरूषामागे लोकसंख्या वाढीचा दर हा मोठा आहे.

नागपूर शहरात १९८१ ते २०११ या वर्षापर्यंतच्या लोकसंख्या वाढीने नागपूर शहरात विस्तार वाढत आहे. अनेक मजली इमारती नागपूर शहरात यामूळे निर्माण झाल्या आहेत. नागपूर शहरातील रस्त्यांवर दूचाकी व इतर वाहनांची गर्दी वाढली आहे. वाढत्या इमारती व वाढणाऱ्या वाहणामूळे रस्ते वाहतूकीस मोठा अडथळा नागपूर शहरात निर्माण झाला आहे. वाढत्या लोकसंख्येमूळे नागपूर शहरात विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. जगात लोकसंख्येचा विस्फोट होत असून वाढती लोकसंख्या अनेक राष्ट्राच्या विकासात अडथळा निर्माण करत आहे. भारत देशात वाढणारा लोकसंख्येचा दर मोठा आहे. यामूळे भारत देशात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. नागपूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या अभ्यासातून अनेक निष्कर्ष निघणारे आहेत.

**निष्कर्ष**

''नागपूर शहरातील लोकसंख्येचा अभ्यास'' या लोकसंख्येच्या अभ्यासातून निष्कर्ष निघालेले आहेत. नागपूर शहराचा लोकसंख्या दर दहा वर्षात वाढत आहे. लोकसंख्या वाढीचा दर १३ टक्केच्या वर आहे. पुरूषांची लोकसंख्या नागपूर शहरात मोठी आहे. स्त्री लोकसंख्या कमी आहे. नागपूर शहरात ० ते ६ वयोगटातील बालकांची संख्या १० टक्के च्या वर आहे. नागपूर शहरात लोकसंख्येच्या घनतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वाढत्या लोकसंख्येमूळे नागपूर शहराचा विस्तार वाढत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. www.censusindia.com
2. nagpur.nic.in
3. nagpurcity.in
4. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२००२) : 'लोकसंख्या भूगोल', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
5. डॉ., नागतोडे, डॉ., लांजेवार, (२००६) : 'नकाशाशास्त्र व प्रात्यक्षीक भूगोलशास्त्र', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
6. पाटील, डॉ., आनंद, (२०११) : 'महाराष्ट्राचा भूगोल', स्टडी सर्कल प्रकाशन, पूणे.
7. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२०१८) : 'महाराष्ट्राचा भूगोल', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
8. डीस्ट्रीक्ट गॅझेटीअर बूक.
9. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२०१७) : 'मानवी भूगोल', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
10. घारपूरे, डॉ., विठ्ठल, (२०१८) : 'भारत भौगोलीक परिचय', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.